पुढारी

# द्राक्ष पिकातील एप्रिल छाटणी व्यवस्थापनावर कार्यशाळा

## विठ्ठलगंगा फार्मर्स कंपनीचा उपक्रम; डॉ. सोमकुंवर, डॉ. देशमुख यांचे मार्गदर्शन

**माढा : पुढारी वृत्तसेवा**

निमगाव (ता. माढा) येथील विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या प्रक्षेत्रावर शेतकऱ्यांच्या विविध पिकांवरील समस्या सोडवण्याच्या दृष्टीने शेतकरी संवाद हा उपक्रम उत्साहात झाला.

१ मे रोजी महाराष्ट्रदिनाचे औचित्य साधून द्राक्ष पिकातील एप्रिल छाटणी व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने कंपनीतर्फे आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमात राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर.जी. सोमकुंवर तसेच वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निशांत देशमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.



**माढा : माढा येथील शेतकरी संवाद कार्यशाळेत बोलताना मान्यवर.**

यावेळी कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे प्रमुख पाहुणे, तर अध्यक्षस्थानी माढा वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष धनराज शिंदे होते. यावेळी मंडळ कृषी अधिकारी संजय पाटील तसेच कंपनीचे व्हाईस चेअरमन श्रीकांत पाटील, पोपट खापरे, नितीन कापसे, महेश मारकड, महेश डोके, प्रशासकीय अधिकारी राहुल वरपे उपस्थित होते.

डॉ. देशमुख आणि डॉ. सोमकुंवर यांनी वाढत्या तापमानाचा घड निर्मितीवर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी सोप्या उपाययोजनांबद्दल माहिती दिली. जिल्ह्यातील द्राक्ष शेती बऱ्याच अंशी फायदेशीर ठरत असून शेतकऱ्यांनी योग्य व्यवस्थापन करून कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन घेणे आवश्यक असल्याचे मत कृषी अधिकारी शिंदे यांनी व्यक्त केले. फाऊंडेशनचे संस्थापक धनराज शिंदे म्हणाले, भविष्यात शेतकऱ्यांनी निर्यातक्षम शेतीमाल उत्पादनावरभर देणे आवश्यक असून कंपनीद्वारे उभारण्यात आलेल्या अद्ययावत पॅकहाऊसचा फायदा करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. आभार नितीन कापसे यांनी मानले.